# अनुसूचित जातीच्या मुला-मुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती.

अनुसूचित जातीच्या व नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांना आार्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षणासाठी परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये प्रवेश घेता येत नाही. विद्यार्थ्यांची  गुणवत्ता असुनही केवळ आर्थिक परिस्थितीमुळे त्यांना उच्च शिक्षणापासुन वंचित राहावे लागते. या विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणा ची संधी मिळावी व त्यांच्या गुणवत्तेला वाव मिळावा म्हणुन विविध विषयामध्ये परदेशातील नामांकित विद्यापीठामध्ये ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर व पी.एच.डी. अभ्यासक्रमाकरीता प्रवेश मिळाला आहे, अशा ५० विद्यार्थ्यांचा (पी.एच.डी.-२४ व पदव्युत्तर-२६)  परदेशातील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते.

## * शासन निर्णय *

**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. ईबीसी-२००९/प्र.क्र.१०३/मावक-२, दि.२२.१०.२०१० व दि.१.११.२०१०**

## योजनेचे अटी व शर्ती

- विद्यार्थी अनु.जाती/नवबौध्द घटकातील असावा.
- विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
- या शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे वय जास्तीत जात ३५ वर्षापर्यंत असावे.
- विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.६.०० लाखापेक्षा जास्त नसावे.
- पी.एच.डी. अभ्यासक्रमासाठी पदव्युत्तर पदवीमध्ये किमान ५०% गुण व प्रथम प्रयत्नामध्ये उत्तीर्ण असावा.
- परदेशातील विद्यापीठात प्रवेश घेतलेला असावा व ते विद्यापीठ हे मान्यताप्राप्त विद्यापीठ असावे.
- पदव्युत्तर पदवीमध्ये अभ्यासक्रमासाठी पदवीला किमा ५०% गुण आवश्यक व प्रथम प्रत्यत्नात उत्तीर्ण असावा.

## लाभाचे स्वरुप :-

१) विद्यापीठाने प्रमाणित केलेला शिक्षण फी ची पूर्ण रक्कम व इतर खर्च मंजुर करण्यात येतो.

२) विद्यार्थ्यास वार्षिक निर्वाहभत्ता अमेरिका व इतर राष्ट्रांसाठी यु.एस.डॉलर १४००० तर यु.के.साठी ९,००० इतका अदा करण्यात येतो.

३) विद्यार्थ्याला आकस्मिक खर्चासाठी यु.एस.ए. व इतर देशांसाठी यु.एस.डी. १३७५ तर यु.के.साठी पौंड १,००० इतके देण्यात येतात. पुस्तके, अभ्यासदौरा इत्यादी खर्चाचा यात समावेश आहे.

४) विद्यार्थ्यास परदेशात जाताना व अभ्यासक्रम झाल्यानंतर परत येताना विमान प्रवासाचा खर्च (Shortest Route & Economy Class) तिकीट सादर केल्यानंतर मंजुर करण्यात येतो.